# मराठा समाजाला आरक्षण देण्याची हीच वेळ

## ■ आ. सरोज आहिरे यांची शासनाकडे लक्षवेधीद्वारे मागणी



**नाशिक : प्रतिनिधी**

मराठा समाजाला आरक्षण देण्याची हीच वेळ असून कायद्याच्या चौकटीत राहून मराठा आरक्षण द्यावे. नाहीतर पुढील पीढी कधीही माफ करणार नाही. मराठा समाजाच्या भावना समजवून आम्ही त्यांच्या पाठीशी असून सर्वांनी पाठींबा देउन मराठा समाजाला आरक्षण द्यावे. तसेच मराठा नम्र झाला म्हणजे तो गरबडला नाही. मात्र तो ज्याच्या विरोधात गेला तो कधीच परवडला नाही. असे सांगत देवळाली विधानसभा मतदारसंघातील आमदार सरोज आहिरे यांनी विधीमंडळात लक्षवेधीद्वारे मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी केली.

यावेळी आ. सरोज आहिरे म्हणाल्या की, महाराष्ट्रात सर्व जाती धर्म चा मोठा भाऊ म्हणून आजतागायत मराठा समाजाने भूमिका बजावलेली आहे. मराठा समाजाला सर्व बहुजनांच्या समर्थनाची खरी गरज असून आरक्षण देण्याची हीच खरी वेळ आहे. १९८२ साली मराठा आरक्षणासाठी दिवंगत माथाडी कामगार नेते अण्णासाहेब पाटील यांनी मोर्चा काढला होता. त्यामुळे आरक्षणाची मागणी जुनी आहे. १९०२ मध्ये आरक्षणाचे जनक राजश्री शाहू महाराज यांनी त्यांच्या राज्यातील सरकारी नोकरीत मागासवर्गीयासाठी ५० टक्के जागा राखीव ठेवण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला. छत्रपती शिवराय फुले शाहु, आंबेडकर यांच्या पुरोगामी वारसा लाभलेला आपला हा महाराष्ट्र आहे. आणि आपण त्या महाराष्ट्रातले लोक प्रतिनिधी आहोत. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री फडणवीस, अजित दादा यांच्याकडून आरक्षणासाठी सकारात्मकतेने प्रयत्न होत आहेत. आम्हाला सर्वांना खात्री आहे की महायुतीचे सरकार मराठा आरक्षण मराठा बांधवांना त्यांचे न्याय हक्क देण्यासाठी शंभर टक्के प्रयत्न करत आहे. परंतु काही समाजविघातक न्यायालय जातात आणि मराठा आरक्षण रद्द करण्यासाठी खटले दाखल करतात. अशा मनोवृत्तीच्या लोकासोबत चर्चा करावी. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज यांनी अठरा पगड जाती, बारा बलुतेदारांना व संपूर्ण बहुजन समाजाला सोबत घेऊन स्वराज्य स्थापन केले. मात्र शिवछत्रपतींच्या महाराष्ट्रात आज जातीजातीमध्ये तेढ निर्माण होत आहे. ओबीसी- मराठा बांधव एकमेकांकडे तिरक्या नजरेने पाहत असून महाराष्ट्राला हे अशोभनीय असल्याचे आ. सरोज आहिरे यांनी म्हटले. कुणाच्याही आरक्षणाला धक्का न लागता मराठा बांधवांना त्यांच्या हक्काचे आरक्षण दिले गेले पाहिजे.

**तरुणांचे नुकसान होणार नाही काळजी घ्यावी**

मनोज जरांगे पाटील यांनी समाजासाठी घेतलेल्या भूमिकेतून आज मोठ नेतृत्व उभे राहिले आहे. ते त्यांची भूमिका चांगल्या पद्धतीने पार पाडत आहेत. आपल्या मतदारसंघात २०१८ शेतकऱ्यांनी एकदा आंदोलन केले होते. त्यात काही लोकांनी भाग घेतला असता त्यांनी कुठल्याही प्रकारे नुकसान केले नाही. तरीही त्यांच्यावर गुन्हे दाखल केले. त्याचा निपटारा करता करता त्यांचे त्यात पाच वर्षे गेलीत. अशा पद्धतीने कुठलेही आंदोलनामध्ये तरुण पिढीचे नुकसान होणार नाही. युवा पिढीचे नुकसान होणार नाही, कोणावर चुकीच्या पद्धतीने गुन्हे दाखल होणार नाही. याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे मराठा समाजाला आरक्षण देणे आवश्यक असल्याची मागणी आमदार सरोज आहिरे यांनी विधानसभेत केली.



# सटाण्यात फिजिओथेरपी कॉलेजमध्ये स्वागत समारंभ

**सटाणा : वार्ताहर**

श्री सोमेश्वर महाराज संचलित येथील तन्मयी कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या सन २०२३ - २४ या वर्षातील नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ सटाणा - भाक्षी रस्त्यालगत राजश्री मंगल कार्यालयात संपन्न झाला.

कार्यक्रमात संस्थेचे संस्थापक तथा सहकार अधिकारी वसंतराव गवळी यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या अध्यक्षा साधना गवळी, अपेक्स हॉस्पिटलचे संचालक डॉ. किरण अहिरे, डॉ. प्रवीण खैरनार, सिम्स हॉस्पिटलचे संचालक डॉ. संदेश निकम, तालुक्यातील मुल्हेर किल्ल्यावरील संत श्री सुदामदास महाराज, कॉलेजचे सेक्रेटरी राजेंद्र गांगुर्डे, नाशिक येथील आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे सागर मुंजवाडकर, निसर्गमित्र अरुणकुमार भामरे, डॉ. चौधरी, डॉ. आशिष गुप्ता, साधना गुप्ता, दर्पण पाडवी, रश्मी सूर्यवंशी, पूनम देवरे, डॉ. यश गवळी, रुपेश वालझाडे, ललित गवळी, सुनील सोनवणे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात अशोक जगताप, रोहित निकम, अनुराधा कोरडे, निकिता जाधव, रितिका रांजणे, ऋतुजा शिंदे, कोमल सोनवणे, श्रुती पहाडे, खुशबू विश्वकर्मा, मयुरी देशमुख, वैष्णवी पाटील, सुमित कोळपे, विजय गायकवाड, रोशन भांगरे, जेमीन गावित आदींनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यावेळी कॉलेजचे विद्यार्थीनी आदिन मणियार व ईकरा शेख यांनी गीत गायन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अझहर यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**टायटल व्हेरीफिकेशनकामी जाहीर नोटीस**

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी जिल्हा नासिक, पोटतुकडी तालुका नासिक पैकी **नासिक** म.न.पा.हद्दीतील **मौजे आनंदवल्ली** गांवचे शिवारातील मिळकत यांसी **सर्व्हे नं.४५/२** पैकी **प्लॉट नं.५अ+५ब** यांसी क्षेत्र २९०-०० चौ.मी. या मिळकतीवरील **श्री अपार्टमेंट** मधील स्टिल्ट मजल्यावरील **फ्लॅट नं.२ (दोन)** यांसी बिल्टअप **क्षेत्र ६१-७३५ चौ.मी.** (कार्पेट क्षेत्र ५१-४४ चौ.मी.) यांसी चतु:सिमा मंजुर नकाशाप्रमाणे आहेत. अशी मिळकत.

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, वर नमुद मिळकत ही **सौ.अरुणा भगवान मथुरे (प्रोप्रा.सायली एंटरप्रायजेस, सिडको, नासिक)** यांचे खरेदी मालकी हक्काची असून सदर मिळकत ही त्यांचे प्रत्यक्ष कबजे वहिवाटीतील मिळकत आहे. तरीही सदरची नोटीस टायटल व्हेरिफिकेशनकामी दिली आहे. तथापि, सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लिज, जप्ती, करारनामा वगैरे बोजा असल्यास संबंधितांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **०७ (सात) दिवसांचे आत** आमचे खालील पत्त्यावर समक्ष येऊन सर्व कागदपत्रांनिशी लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजणेत येईल. त्यानंतर आलेल्या हरकती आमचे पक्षकारांवर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही तसेच परस्पर वृत्तपत्रात दिलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

कळावे, ही जाहीर नोटीस. नाशिक. दि.१८/१२/२०२३.

**ॲड.मुकुंद रामचंद्र ओढेकर**

शिवदुर्गा बंगला,डॉ.भाभानगर,नवीन मुंबई-आग्रारोड,नासिक.मो.९३२५६६८०६९




# मेरी शाळेत ग्रंथालय सप्ताह

## ग्रंथ वाचनाने ज्ञान समृद्ध होते : कवी सोमवंशी

**नाशिक प्रतिनिधी:**

ग्रंथ वाचनाने आपले ज्ञान समृद्ध होते. शब्द संपत्ती वाढते. सतत केलेल्या वाचनामुळे आपली प्रगती होते. साहित्य विश्वात रमल्याने आपला सर्वांगीण विकास होतो असे प्रतिपादन कवी राजेंद्र सोमवंशी यांनी केले. नाशिक एज्युकेशन सोसायटी संचलित सी.डी.ओ. मेरी हायस्कूलच्या ग्रंथालय सप्ताहाच्या समारोप समारंभप्रसंगी सोमवंशी बोलत होते. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक राजेंद्र कापसे होते.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शाळा प्रतिनिधी तथा शिक्षक मंडळाचे अध्यक्ष दिलीप अहिरे,पालक शिक्षक संघाच्या कार्याध्यक्ष जयश्री काशीकर तसेच सदस्य सुनीता मुळे व दिशा बेंडाळे उपस्थित होते. प्रारंभी संस्थेचे माजी अध्यक्ष स्व. प्रा. सूर्यकांत रहाळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. शाळेतील गीत मंचाने संगीत शिक्षिका सायली कुलकर्णी, श्वेता देशपांडे व जयश्री खोसे यांच्या मार्गदर्शनाखाली सुमधुर स्वागत गीत सादर करून सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

स्वागत व प्रास्ताविक मुख्याध्यापक राजेंद्र कापसे यांनी केले. श्वेता देशपांडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी दिलीप अहिरे यांनी पुस्तकांशी मैत्री केल्याने आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो असे सांगितले. याप्रसंगी सकाळ व दुपार सत्रातील विविध स्पर्धातील विजेत्यांचा गुणवंत विद्यार्थ्यांचा ग्रंथ देऊन सन्मान करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन भागवत सूर्यवंशी, नितीन जाधव, राजेंद्र पारधी, छाया गायकवाड यांनी केले.१७५ विद्यार्थ्यांचा व विद्यार्थिनींचा पारितोषिक गौरव करण्यात आला. यावेळी शाळेचे उपमुख्याध्यापक रवींद्र हाते, पर्यवेक्षिका सुरेखा सोनवणे,सूर्यभान जगताप, भागवत सूर्यवंशी, अनुराधा सोनवणे यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्य पालक उपस्थित होते. स्नेहा जगताप यांनी सूत्रसंचालन केले तर ग्रंथपाल बाबुराव मुरडणर यांनी आभार मानले.


**मालेगाव महानगरपालिका, मालेगाव**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**

जाहीर निविदा सूचना क्र. ०७/२०२३-२४ (फेर निविदा प्रथमवेळ)

मा. आयुक्त तथा प्रशासक मालेगाव महानगरपालिका, हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ''महानगरपालिका हद्दीतील महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) महाअभियान योजनेअंतर्गत एकुण ०६ कामांची (फेर निविदा प्रथमवेळ) ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन पध्दतीने) मागवित आहे. सदर निविदा सूचना मा. शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. निविदा सूचनेत कामासंबंधी संपूर्ण माहिती, अटी शर्ती, निविदा प्रपत्र विक्री, दाखल करणेचा दिनांक, निविदा उघडणे इ माहिती वरील संकेतस्थळावर दिनांक: १८/१२/२०२३ दुपारी १५.०० वाजेपासून ते दिनांक:- ०२/०१/२०२४ सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर कामासाठी आवश्यक ती माहिती उप अभियंता सा.बांध विभाग, म.न.पा मुख्य कार्यालय यांचेकडून प्राप्त करता येईल.

ई निविदा क्रमांक: १ ते ६

**आयुक्त तथा प्रशासक**
**मालेगाव महानगरपालिका, मालेगाव**


# तरुणीच्या वाढदिवशीच केला प्रियकराने खून

**नागपूर** : प्रेयसीचा खून केल्याप्रकरणी प्रियकराला अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने दोषी ठरवत जन्मठेप, १० हजार रुपये दंड आणि दंड न भरल्यास तीन महिने अतिरिक्त कारावासाची शिक्षा सुनावली. रोहित मनोहर हेमनानी उर्फ भोलानी (सिंधी कॉलनी, खामला) असे आरोपी प्रियकराचे नाव आहे.


निशाणी नं.

**जाहीर नोटीस**

क्र.आर.टी.एस./कावी/०३/२०२३ **ॲड.अनिस बी. शेख**

**निफाड येथील मे.कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार साहेब निफाड** यांचे कोर्टात ...

**सुरेश मन्मथ हिंगमिरे**, वय : ५९, धंदा - शेती ) **अर्जदार**
रा.मु.पो.चांदोरी, ता.निफाड, जि.नाशिक

**विरूध्द**

**निबंधक जन्म व मृत्यु नोंदणी अधिकारी सो.** ) **सामनेवाले**
ग्रामपालिका चांदोरी, ता.निफाड, जि.नाशिक

ज्याअर्थी अर्जदार यांनी भारत राजपत्र दि.११/०८/२०२३ पासुन जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ नुसार मुख्या कायद्याच्या नोंदणी कायदा १९६९ चे कलम (१३)(२) आणि (३) नुसार उपरोक्त जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, **मौजे चांदोरी**, ता.निफाड येथील **कै.सुशिलाबाई मन्मथ हिंगमिरे** यांचा मृत्यु दाखला मिळणेबाबत अर्ज दाखल आहे. कै.सुशिलाबाई मन्मथ हिंगमिरे ह्या दि.०७/०६/१९९८ रोजी चांदोरी, ता.निफाड येथे मयत झालेल्या आहेत.ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय चांदोरी, ता.निफाड, जि.नाशिक यांचेकडील दि.१५/०२/२०२३ रोजीच्या पत्रानुसार अर्जदार यांच्या आई कै.सुशिलाबाई यांचा मृत्यु झाला आहे. परंतु सन १९९७/९८ चे मृत्यु रजिष्टर तपासले असता मृत्युची नोंद ग्रामपंचायत कार्यालय चांदोरी यांचे रेकॉर्डला झालेली नाही, असे प्रमाणपत्र दिले आहे. त्याअर्थी याबाबत कोणाचे काही म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी **सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर ३० दिवसाचे आत अगर दि.०९/०१/२०२४ रोजी दुपारी ३:०० वाजता** तहसिल कार्यालय निफाड येथे सुनावणी आयोजित केली आहे. सदर अर्जाबाबत कोणाची हरकत असल्यास निफाड येथील मे.कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार साहेब निफाड यांचे कोर्टात तक्रार/हरकत दाखल करावी. वरील मुदतीत कोणाची हरकत/तक्रार प्राप्त न झाल्यास प्रकरणात उपलब्ध कागदपत्रांचे अनुषंगाने निर्णय घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस आज दि.०६/१२/२०२३ रोजी आमचे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली आहे.

कोर्टाचा शिक्का

सही/- **(शरद घोरपडे साहेब)**
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार सो.निफाड



**नाशिक महानगरपालिका,नाशिक**
**वृक्ष प्राधिकरण विभाग**
**महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये**

**जाहीर नोटीस**

नाशिक महानगरपालिका हद्दितील पश्चिम विभागाअंतर्गत धोकादायक वाळलेले व बांधकाम बाधित वृक्ष तोडणे / पुनर्रोपण / छाटणी बाबत वर नमुद अधिनियमातील कलम ८ (२) अन्वये वृक्ष प्राधिकरणाकडे लेखी अर्ज सादर करणेत आले आहेत.

ज्या अर्थी, वृक्ष प्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या अर्जाबाबत अधिनियमातील कलम ८ (३) अन्वये स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन कमाल ०७ (सात) दिवस कालावधी मध्ये हरकती तथा सुचना मागविणेचे सुचित केले आहे. त्याअनुषंगाने अधिनियमातील अटी व शर्ती अधिन राहून प्राप्त अर्जाची छाननी झाल्यानंतरच त्याबाबतच्या अहवालासह वृक्ष अधिकारी पश्चिम यांनी प्रस्ताव तयार केले आहे. सदरचे प्रस्ताव पश्चिम विभागीय कार्यालय उद्यान विभागात उपलब्ध असून प्रस्तुत प्रकरणी हरकती तथा सुचना असल्यास लेखी स्वरुपात पश्चिम विभागीय कार्यालय येथे जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ७ (सात) दिवसांचे मुदतीत द्याव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

सही /-
जनसंपर्क/जा.क्र./३६४
दि.१८/१२/२०२३

मुलगा-मुलगी भेद नको, मुलगी झाली खेद नको.

विभागीय अधिकारी तथा
वृक्ष अधिकारी, नाशिक पश्चिम
नाशिक महानगरपालिका, नाशिक.



**एसएमएफजी इंडिया होम फायनान्स कंपनी लिमिटेड**

SMFG Grihashakti — Nayi Asha. Naya Vishwas.

(पूर्वीची फुलर्टन इंडिया होम फायनान्स कंपनी लिमिटेड)

कॉर्पोरेट कार्यालय: ५०३ व ५०४, इन्स्पायर बीकेसी, बीकेसी मेनरोड, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५२. महा.
नोंदणीकृत कार्यालय, मेघ टॉवर्स, ३ रा मजला, जुना नं. ३०७, नवा नंबर १६५, पुनामल्ली हाय रोड, मधूरावोयाल, चेन्नई-६०००९५, तामिळनाडू

**स्थावर मालमत्तेबाबत ताबा सूचना [(परिशिष्ट ४) नियम ८(१)]**

ज्याअर्थी खालील सही करणार प्राधिकृत अधिकारी, एसएमएफजी इंडिया होम फायनान्स कंपनी लिमिटेड (पूर्वीची फुलर्टन इंडिया होम फायनान्स कंपनी लिमिटेड), गृहकर्ज देणारी कंपनी [नॅशनल हौसिंग बँकेकडे (आरबीआय मालकी असलेल्या) नोंदणीकृत] त्यानंतर **SMFGIHFCL** संबोधलेली यांनी **SARFAESI** कायदा २००२ (२००२ चा ५४) चे कलम १३ (१२) व सुरक्षित व्याज (सक्तवसुली) नियम २००२ च्या नियम ३ प्रमाणे प्राप्त अधिकारानुसार कलम १३ (२) खाली तुम्हास कर्जदार म्हणून (नावे खालीलप्रमाणे) मागणी सूचना (डिमांड नोटीस) खालील तारखेला बजावून ती मध्ये दर्शविलेली रक्कम व त्यावरील व्याज नोटीस मिळाल्यापासून **६०** दिवसांत भरण्यास सूचित केले आहे. ही सर्व रक्कम न भरली गेल्याने ही आज रोजी सूचना कर्जदार व सर्व जनतेला देण्यात येत आहे की, खालील सही करणार कायद्याच्या कलम १३ (४) व सुरक्षित व्याज (सक्तवसुली) नियम ८ प्रमाणे प्राप्त अधिकारानुसार खाली दर्शविलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेत आहेत. यामध्ये उल्लेखिलेल्या कर्जदारांस व सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, या मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये व तसे केल्यास **SMFGIHFCL** (पूर्वीची फुलर्टन इंडिया होम फायनान्स कंपनी लिमिटेड) च्या खालील रक्कम व त्यावरील व्याजाचा तारणास बांधलेले राहतील.

| अ. नं. | कर्जदार/सहकर्जदारांचे नावे कर्ज खाते क्रमांक | तारण मालमत्ता वर्णन | मागणी सूचना तारीख/रक्कम | सांकेतिक ताबा घेतल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | * कर्ज खाते क्र.602007210341260<br>**१) सौ. भोसले जिजाबाई जगन** जगन्नाथ शिवाजी भोसले यांच्या पत्नी<br>**२) श्री. मनोज जगन्नाथ भोसले**<br>**पत्ता १ :** (क्रं.१ व २) रूम नं.५, गिरीधर रो-हाऊस, नेहा लॉन्ड्रीजवळ, श्रमिकनगर, सातपूर, नाशिक.महाराष्ट्र- ४२२०१२<br>**कामाचा पत्ता :** (क्र.१) सनसुबा पॉवर डील लि.,<br>**पत्ता:** ए/२जी, पहिला मजला, वसंत मार्केट, कॅनडा कॉर्नर,समर्थ मंगल कार्यालयाजवळ, नाशिक. महाराष्ट्र- ४२२०१०.<br>**पत्ता:** (क्र.१) रो-हाऊस क्रमांक ४, तळ+पहिला मजला, गिरीधर अपार्टमेंट, प्लॉट नं.१४, सर्व्हे नं.२०१/बी/१, नेहा लॉन्ड्रीसमोर, सातमाऊली मंदिरामागे, श्रमिकनगर, पिंपळगाव बहुला शिवार, ता.जि.नााशिक.महाराष्ट्र ४२२०१०. | रो-हाऊस क्रमांक ४, तळ+पहिला मजला, गिरीधर अपार्टमेंट, प्लॉट नं.१४, सर्व्हे नं.२०१/बी/१, नेहा लॉन्ड्रीसमोर, सातमाऊली मंदिरामागे, श्रमिकनगर, पिंपळगाव बहुला शिवार, ता.जि.नाशिक.महाराष्ट्र ४२२०१०.<br>त्यांसी चतु:सीमा- **पूर्वेस**-रो-हाऊस नं.५ **पश्चिमेस**- कॉलनी रस्ता, **उत्तरेस**- रो-हाऊस नं.३ **दक्षिणेस**- प्लॉट नं.१५ | दि.०५.०४.२०२१ रु.७,२०,३३६.४३/- (रुपये सात लाख वीस हजार तीनशे छत्तीस रुपये त्रेचाळीस पैसे मात्र) ३०.०३.२०२१ पावेतो | **१६.१२.२०२३ (सांकेतिक ताब्यात)** |

सही/-
प्राधिकृत अधिकारी
एसएमएफजी इंडिया होम फायनान्स कंपनी लिमिटेड
(पूर्वीची फुलर्टन इंडिया होम फायनान्स कंपनी लिमिटेड)

स्थळ: नाशिक, महाराष्ट्र
तारीख: १६/१२/२०२३


# किसनलालजी बोरा इंग्लिश मीडियम स्कूलचा तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात द्वितीय क्रमांक

**वणी : प्रतिनिधी**

तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात श्री किसनलालजी बोरा इंग्लिश मीडियम स्कूलला उच्च प्राथमिक विभागात द्वितिय क्रमांक मिळाला.



वणी येथे आयोजीत शिक्षण विभाग पंचायत समिती दिंडोरी, तालुका विज्ञानाअध्यापक संघ , दिंडोरी व के.आर. टी. हायस्कूल वणी यांचे संयुक्त विद्यमाने संपन्न झालेल्या ५१ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात श्री किसनलालजी बोरा इंग्लिश मीडियम स्कूल च्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले असून उच्च प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक पटकाविल्याने शाळेचे अध्यक्ष महेंद्र बोरा संचालक मंडळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले. के.आर. टी. हायस्कूल येथे झालेल्या तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनात उच्च प्राथमिक विभागात श्री किसनलालजी बोरा इंग्लिश मीडियम स्कूलच्या आशिष जाधव, जन्मजय देवरे , समर्थ संगमनेरे प्राची जाधव व वैष्णवी कोंड ह्या विद्यार्थ्यांनी स्मार्ट व्हिल चेअर या उपकरणाचे सादरीकरण केले होते. ह्यासाठी प्राचार्या योगिता चिंचोले व शाळेतील विज्ञान शिक्षकांचे त्यांना मार्गदर्शन लाभले होते. ह्या उपकरणास उच्च प्राथमिक विभागात द्वितिय क्रमांक मिळाला.


**टायटल व्हेरीफिकेशनकामी जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :- अ)** तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी **तालुका सिन्नर** पैकी **मौजे पाथरे खु.** ग्रामपंचायत यांचे हद्दीतील **भुमापन क्र. व उपविभाग क्र.१३७/३/२** (यांसी **युएलपीन-३४०८१५०९१२७**) यांसी एकूण क्षेत्र ४०-०० आर चौ.मी. ज्यापैकी सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्लीयांचे क्षेत्र ७-५० आर यांसी आकार रु.७५=०० पैसे, वगळता **उर्वरीत संपूर्ण वाणिज्य पेट्रोल पंप प्रयोजनासाठी श्रीमती आशा संतोष आभाळे यांचे मालकीचे अकृषिक क्षेत्र ३२-५० आर चौ.मी.** यांसी आकार रुपये ३२५=०० पैसे.ही मिळकत.
**ब)** वर कलम अ मध्ये नमुद मिळकतीवर **मे.श्री साईलक्ष्मी पेट्रोलियम** या फर्मचे ऑफीस यांसी **पाथरे खु. ग्रामपंचायत मालमत्ता क्र.४८१** यांसी **एकूण बांधीव क्षेत्र ५५-२० चौ.मी.** यांसी चतु:सिमा मंजुर बांधकाम नकाशाप्रमाणे

उपरोक्त **कलम अ** व **ब** मध्ये वर्णन केलेली मिळकत **श्रीमती आशा संतोष आभाळे** यांचे मालकीची व कबजेवहिवाटीतील असून **बँक ऑफ बडौदा, शाखा कोपरगांव** व **दि कोपरगांव पिपल्स को.ऑप.बँक लि.,शाखा कोपरगांव** यांचे कर्जाव्यतिरिक्त आणि **हिन्दुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि.** यांचेसोबत नोंदणीकृत केलेल्या **भाडेपट्टा (लिज) करारनामा** व्यतिरिक्त सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे, असे मिळकत मालक यांनी खात्रीने व भरवशाने सांगितले आहे. सदर मिळकत आमचे पक्षकारास खरेदी घ्यावयाची असल्याने प्रस्तुत टायटल व्हेरीफिकेशनकामी जाहीर नोटीस प्रसिध्द केली आहे. तथापि, सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क, हितसंबंध, जनरल मुखत्यार,गहाण,दान,लिन, लिज, अन्नवस्त्र, करार, पोटगी, बक्षिस, तारण कर्ज, कोर्टवाद, जामीनकी, कोर्ट जप्ती, हद्दीचा रस्त्याचा वाद अथवा कोणताही वाद इत्यादी असल्यास अशा इसमांनी अथवा हक्क सांगणाऱ्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून **१० (दहा) दिवसांचे आत** आमचेकडे वरील पत्त्यावर समक्ष येऊन कागदपत्रांच्या सत्यप्रतीत नकला देऊन आमची खात्री पटवुन द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, असे समजण्यात येऊन निर्वेधपणाबाबतचा दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. कळावे, दि.१८/१२/२०२३.

**श्री.योगेश मंगलदास पाटील,ॲडव्होकेट**
ऑफीस नंबर १६, शिवराम संकुल, कान्हेरेवाडी,नाशिक.
मो.नं.९२२४६३८९६३ / ९४०३५८७६४६.



**कोटक महिंद्र बँक लिमिटेड**

kotak®

CIN No. L65110MH1985 PLC038137

**नोंदणीकृत कार्यालय:** २७ BKC, C 27, G ब्लॉक, बांद्रा- कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०००५१ महा. क्षेत्रीय कार्यालय- अॅडमास प्लाझा, ४ था मजला, १६६/१६ सीएसटी रोड, कोलिवरी गाव, कुंची कुर्ले नगर, हॉटेल हरेकृष्णाजवळ, सांताक्रुझ (पूर्व) मुंबई- ४०००९८ (महा)

**लिलावासह विक्रीसाठी जाहीर सूचना**

सर्व जनतेस व विशेषत: कर्जदार/सह कर्जदार. जामीनदार यांना याद्वारे ताजी नोटीस (सूचना) देण्यात येत की, खाली दर्शविलेली स्थावर मालमत्ता, जी कोटक महिंद्र बँक लिमिटेड यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांस गहाण देण्यात आलेली असून जिचा ताबा कोटक महिंद्र बँक लिमिटेड यांच्या प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे आहे. **तिची ''जेथे आहे जशी आहे'', '' जशी आहे तशी आहे'' आणि '' जे काही आहे''** या तत्त्वावर विक्री करण्यात येणार आहे. त्याकामी आमचे ई-लिलाव सेवा भागीदार मे. सी.वन.इंडिया प्रा.लि. यांच्या www.c1India.com या पोर्टलवर ऑनलाईन बोली लावण्यास खाली सही करणार प्राधिकृत अधिकारी निमंत्रित करीत आहेत. तपशील पुढीलप्रमाणे

| | |
|---|---|
| कर्ज खाते क्रमांक | HF 37607640, HF 37608690 |
| कर्जदार/ जामीनदार/ गहाणदार यांची नावे | १) श्री पद्माकर प्रेमचंद शिंदे (कर्जदार)<br>२) प्रवीणचंद्र पद्माकर शिंदे (सह कर्जदार) |
| मागणी सूचना तारीख व रक्कम (१३ (२) नोटीस तारीख व रक्कम | १८-०२-२०१९ व रु.६६,८०,२३६.४८( रुपये सहासष्ट लाख ऐंशी हजार दोनशे छत्तीस व पैसे अठ्ठेचाळीस मात्र) दि. १८-०२-२०१९ रोजी असलेली |

| मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत रु.मध्ये | बयाणा रक्कम रु.मध्ये |
|---|---|---|
| ऑफिस F1-B& F2 पहिला मजला, युटिलिटी अपार्टमेंट, फायनल प्लॉट क्र.३७२ P ३८३ ते ३८६ ABCD सर्व्हे क्र.657/1A/1, TPS II चा भाग, सिटी 6792 राजीव गांधी भवनसमोर, शरणपूर रोड, नाशिक शिवार, तालुका जिल्हा नाशिक-४२२००८ | रु.९१,७७,८८६.९०/- (रुपये एक्क्याण्णव लाख सत्त्याहत्तर हजार आठशे श्याऐंशी रुपये नव्वद पैसे मात्र) | रु.९,१७,७८८.६९ (नऊ लाख सतरा हजार सातशे अठ्ठ्याऐंशी रुपये व पैसे एकोणसत्तर मात्र) |

| मालमत्ता परीक्षण वेळ व तारीख | लिलाव तारीख व वेळ |
|---|---|
| दि. १०-०१-२०२४, दु. ०२.०० ते ०४.०० | दि.१६-०१-२०२४ दुपारी २.३० ते ३.३० |

| बोली वाढविण्याची रक्कम | बोली व बयाणा सादर करणेची अंतिम तारीख |
|---|---|
| रु.१,००,०००/- (रुपये एक लाख) | दि.१५-०१-२०२४ सायं.५ वाजेपर्यंत |

**विक्रीच्या महत्त्वाच्या अटी व शर्ती**

(१) लिलावाच्या अटी व शर्ती व प्रक्रिया बोलीच्या कागदपत्रांत **(Bid documents)** मध्ये नमूद केल्याप्रमाणे असतील. बोली लावू इच्छिणाऱ्यांनी आमचे ई-लिलाव सेवा पुरवठादार मे सीवन इंडिया प्रा.लि. यांच्या **https://www.bankeauctions.com** या पोर्टलवरून सुरक्षित स्थावर मालमत्तेचा तपशील आणि ऑनलाईन दाखला केल्या जाणाऱ्या बोली अर्जाची माहिती घ्यावी.
(२) सर्व इच्छुक खरेदीदारांनी/बोलीदारांनी वर उल्लेखिलेल्या वेळ पार्टलवर **https://www.bankeauctions.com** आपली नोंदणी करून स्वत: लिलावात लिलावाचे दिवशी व वेळी सहभागी होण्यासाठी आपला यूझर आयडी व पासवर्ड मोफत तयार करून घ्यावा.
(३) कोणतीही चौकशी, माहिती, प्रक्रियेविषयी प्रशिक्षण आवश्यक असल्यास इच्छुक बोलीदार **मे. सीवन इंडिया प्रा.लि. यांच्या विभागाचे श्री.विनोद चौहान यांचेशी फोन नं. +917291971124, 25, 26,** मोबाईल क्र. **9813887931** व ईमेल आयडी: **delhi@c1india.com** व **support@bankeauctions.com** यावर संपर्क करू शकतील.
(४) प्राधिकृत अधिकाऱ्यांना प्राप्त माहितीनुसार या स्थावर मालमत्तेवर ३ वर कोणतेही बोजे नाहीत. तथापि इच्छुक बोलीदारांनी तिच्याविषयी स्वतंत्रपणे चौकशी टायटल/घेणे/अधिकार/ बोजा वगैरे बाबद समाधान करून बोली लावण्यापूर्वी घ्यावे. ही ई-लिलाव जाहिरात कोटक महिंद्र बँक लि.च्या वतीने कोणतेही प्रतिनिधीत्व किंवा खाली मानली जाऊ नये. ही मालमत्ता सर्व ज्ञात/अज्ञात आजच्या भविष्यातील /प्राधिकृत अधिकारी हक्कांचा विचार करून बँकेने विक्रीस काढली आहे. सुरक्षित धनको **(Secured Creditor)** हे तिऱ्हाईतांच्या कोणत्याही हक्क/ घेणे/मागण्यांना बांधील नाहीत.
(५) ई-लिलावात सहभागी होण्यासाठी इच्छुक खरेदीदार/बोलीदारांनी https://www.bankeauctions.com या वेब पोर्टलवर बिनव्याजी बयाणा रकमेच्या कोटक महिंद्र बंक लिमिटेड मुंबईच्या नावाने काढलेल्या डिमांड ड्राफ्टचा तपशील दाखल करणे आवश्यक आहे. तसेच पॅन कार्ड, आधारकार्ड, निवासी पत्त्याचा पुरावा, कंपनी असल्यास संचालक मंडळ ठराव सर्व स्व साक्षांकित करून सोबत जोडणे आवश्यक आहे.

कर्जदार/गहाणदार/जामीनदार याद्वारे वैधानिक नोटीस देण्यात येते की, **SARFAESI ACT** मधील नियम **6(2), 8(6)** व **9 (1)** प्रमाणे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून **१५** दिवसांत या संबंधीची संपूर्ण देय रक्कम व्याज व खर्चासह भरावी. कसूर असल्यास वरीलप्रमाणे मालमत्तेची विक्री करण्यात येईल. या नोटीसीच्या वृत्तपत्रीय भाषांवर व इंग्रजी मूळ प्रतिमध्ये काही तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी हेच ग्राह्य मानण्यात येईल. कर्जदार/गहाणदार/जामीनदारांनी ही रक्कम तारखेपूर्वी भरून दिल्यास ही प्रक्रिया थांबविण्याची शक्यता आहे.

अधिक तपशील व अटी शर्तीसाठी आमची अधिकृत वेबसाईट **https://www.kotak.com/en/bank-auctions.html** किंवा प्राधिकृत अधिकारी **श्री. इस्माईल देशमुख** मो. **9324906979,** ईमेल आयडी: **Ismail.Desmukh@kotak.com, कन्हैय्याशाम गुप्ता @ 8369156909** ईमेल आयडी: **kanhyasham.Gupta@kotak.com** व **श्री . अशोक मोटवाणी @ 9873737351** ईमेल आयडी: **ashok.motwani@kotak.com** यांचेशी क्षेत्रीय कार्यालयात संपर्क साधावा.

विशेष सूचना- ई-लिलाव आमचे सेवा पुरवठादार मे. सीवन् इंडिया प्रा.लि. यांचेद्वारे कोटक महिंद्र बँक लिमिटेच्या वतीने निर्देशित तारखेला करतील. व इच्छुक बोलीदार आपले घर/ कार्यालय/इतर ठिकाणाहून राखीव किंमतीपेक्षा अधिक किंमतीची बोली लावतील. इंटरनेट व इतर साधनांची उपलब्धता ही पूर्णपणे बोली लावणार यांची जबाबदारी राहील. यंत्रेणेची तांत्रिक बिघाडाची कोणतीही जबाबदारी मे.सीवन इंडिया प्रा.लि. किंवा कोटक महिंद्र बँक ही स्वीकारणार नाहीत. अशा अचानक शेवटच्या वेळी उद्भवणाऱ्या स्थितीचा विचार करून बोलीदारांनी त्यासाठी जी व्यवस्था/पर्यायी व्यवस्था करून ठेवावी, अशी परिस्थिती टाळण्यासाठी बोलीदारांनी पुरेसे आधीच आपली बोली/सुधारीत वाढीव बोली लावावी, असेही सूचविण्यात येत आहे.

सही/-
प्राधिकृत अधिकारी
कोटक महिंद्र बँक लिमिटेड करिता.

स्थळ: नाशिक
तारीख: १८/१२/२०२३


# प्रलंबित खटल्यांसाठी लोकन्यायालय

**सटाणा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विधी प्राधिकरण मुंबई यांच्या आदेशाने तालुका विधी सेवा समिती व सटाणा वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने येथील न्यायालयात प्रलंबित व दाखलपूर्व खटल्यांचे लोकन्यायालय आयोजित करण्यात आले.




लोकन्यायालयाचे उद्घटन न्यायाधीश अमित कोळी, न्यायाधीश यु.पी. हिंगमिरे, वकील संघाचे अध्यक्ष ॲड. पंडीतराव भदाणे आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. लोकअदालतीमध्ये ६१ प्रलंबित खटले तसेच एकूण १ कोटी २ लाख ८९ हजार २३५ रुपयांचे प्रकरण निकाली काढण्यात आले. यात एकूण ४८ लाख ५० हजार २४२ रुपयांची वसुली व दाखलपूर्ण प्रकरणांमध्ये २५५३ प्रकरण निकाली काढण्यात येऊन एकूण ५४ लाख ३८ हजार ९९३ रुपयांची वसुली करण्यात आली. यावेळी न्यायालयीन कर्मचारी प्रविण जाधव, सहाय्यक अधिक्षक बी. एम. जाधव, दिपक मराठे, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी नितीन देशमुख आदी उपस्थित होते.